शासकीय / निमशासकीय मंडळे, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय अनुदानप्राप्त संस्था यांच्या कार्यालयाच्या विजेच्या वापरामध्ये बचत

**महाराष्ट्र शासन**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
परिपत्रक क्र. इसीए २००५/ प्र.क्र. ३७/ ऊर्जा १
मंत्रालय, मुंबई - ३२
दि. २३.१.२००५

## परिपत्रक

राज्याच्या आर्थिक विकासाकरिता पुरेशा प्रमाणात ऊर्जेची आवश्यकता आहे. परंतु, वीजेची वाढती मागणी व त्यामानाने अपुरा पुरवठा यामुळे वीजेच्या तुटवड्यात वाढ होत आहे. वीज पुरवठ्याची स्थिती सुधारण्याचे शासनाचे प्रयत्न सुरू असले तरी नजीकच्या काळात त्यामध्ये लक्षणीय बदल होण्याची संभावना नाही. वीजेच्या तुटवड्यामुळे राज्यात सध्या २५०० ते ३००० मे.वॅ. इतके भारनियमन करावे लागत आहे. यामुळे राज्याच्या आर्थिक विकासावर विपरित परिणाम होत आहे

२. या परिस्थितीत वीजेचा कार्यक्षम वापर करून तिची पुरेपूर बचत करणे अगत्याचे झाले आहे. ऊर्जेची बचत म्हणजे एक प्रकारे ऊर्जेची निर्मितीच होय. वीजेचे एक युनिट वाचविले गेले तरी त्यामुळे त्याच्या २.५ ते ३ पट क्षमतावाढ टाळता येते. नवीन क्षमतावाढीसाठी येणाऱ्या खर्चाच्या केवळ १/५ खर्च करून अशी बचत साधता येते. वीजेची बचत ही काळाची गरज आहे. वीजेची बचत करण्यामुळे मागणी - पुरवठ्याची स्थिती सुधारेल. तसेच ही गोष्ट पर्यावरणासाठी देखील अनुकूल ठरेल आणि शासकीय खर्चात देखील बचत होईल.

३. देशभरामध्ये ऊर्जा बचतीचा कार्यक्रम जोरदारपणे राबविण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने ऊर्जा बचत अधिनियम, २००१ पारित केला आहे व त्याअंतर्गत ब्यूरो ऑफ एनर्जी

एफिशियंसीची स्थापना केली आहे. या अधिनियमाची राज्यामध्ये अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाची Designated Agency म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

४. राज्यामध्ये या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून त्याद्वारे वीजेच्या वाढत्या तुटवड्यावर अंकुश ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी शासकीय पातळीवर वीज बचतीसाठी प्रथम प्रयत्न करून सर्वसामान्य जनतेला वीज बचत करण्यासाठी प्रेरणा देणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांचे प्रशासकीय नियंत्रणाखाली येणारी सर्व कार्यालये यांच्या वीज वापरात बचत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यादृष्टीने आपला विभाग व त्याखालील सर्व कार्यालयांच्या/महामंडळे/मंडळे/स्थानिक स्वराज्य संस्था/शासकीय अनुदानप्राप्त संस्था यांच्या वीज वापरात सुमारे २० % इतकी बचत करण्याचे उद्दिष्ट ठरवून देण्यात येत आहे. सदर उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने पुरेपूर प्रयत्न करण्यात यावेत.

(रा॰ मे. प्रेमकुमार)
मुख्य सचिव.

सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
मंत्रालय,
मुंबई

---

एच-942(300-2-05).
circular.doc